January - 2024

E-ISSN : 2348-7143

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

ISSUE : 335

## Multidisciplinary Issue



Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] India.

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Smt. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Swati Lawange, Yeola (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Scanned with OKEN Scanner

January 2024 E-ISSN : 2348-7143

## International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

**International E-Research Journal**

**Peer Reviewed, Referred & Indexed Journal**

**Issue : 335**

## Multidisciplinary Issue

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] India.**

**Executive Editors :**
**Dr. Tejesh Beldar,** Nashikroad (English)
**Dr. Gajanan Wankhede,** Kinwat (Hindi)
**Smt. Bharati Sonawane,** Bhusawal (Marathi)
**Dr. Swati Lawange,** Yeola(Marathi)
**Dr. Rajay Pawar,** Goa (Konkani)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible, answerable and accountable for their content, citation of sources and the accuracy of their references and bibliographies/references. Editor in chief or the Editorial Board cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights. Any legal issue related to it will be considered in Yeola, Nashik (MS) jurisdiction only.*

***- Chief & Executive Editor***

**SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS**

For Details Visit To : **www.researchjourney.net**

***Cover Photo Source :** https://en.wikipedia.org/wiki/Ram_Mandir#/media/
File : Ayodhya_Ram_Mandir_Inauguration_Day_Picture.jpg

© **All rights reserved with the authors & publisher** **Price : Rs. 1000/-**



Scanned with OKEN Scanner

# Editorial Board

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Dr. Tejesh Beldar,** Nashikroad (English)
**Dr. Gajanan Wankhede,** Kinwat (Hindi)
**Mrs. Bharati Sonawane,** Bhusawal (Marathi)
**Dr. Swati Lawange,** Yeola(Marathi)
**Dr. Rajay Pawar,** Goa (Konkani)

**Co-Editors -**
- **Prof. Mohan S. -** Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva -** Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju –** Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar -** BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar -** Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik -** Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh -** Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath**- Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - BoS Member (SPPU), MGV's LVH College, Panchavati-Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi -** Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**
- **Prof. K. M. Waghmare -** Librarian, Anandibai Raorane College, Sawantwadi **[M.S.] India**
- **Prof. Vidya Surve-Borse**- MGV's LVH Arts, Sci. & Com.College, Panchavati-Nashik **[M.S.] India**

**Advisory Board -**
- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare -** Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur -** Chairman, BoS, Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. B. V. Game** - Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**
- **Dr. J. S. More** - BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**- BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali,** HoD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** - Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar -** M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.
- **Dr. R.D. Shinde,** HoD, Marathi, KPG Arts, Commerce & Science College, Igatpuri.

**Published by –**
© **Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

## INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| | **English Section** | | |
| 1 | Historical Hues: Analyzing the Depiction of the Mughal Era in Indian English Fiction | Prof. Dilip Kute | 4 |
| 2 | Innovative Dramatic Techniques: New Dimensions of the Indian English Drama | Dr. Hemantkumar Patil | 14 |
| 3 | Pain as Literary Art: A Reading of Illness Memoirs to Understand the use of the Figurative Language to Define Illness, Life and Mortality | Mr. Ankit Banpurkar | 19 |
| 4 | Language: A Sociocultural System | Dr. Sanju Jadhav | 23 |
| 5 | An Analytical Study of Baby Kamble's Memoir 'The Prison We Broke' As | Prof. Minakshi Ingole | 27 |
| 6 | The Role of Keshavrao Jedhe and Dinkarrao Javalkar in Impact of Chhatrapati Mela in Pune Maharashtra | Dr.Sanjay Shelar | 31 |
| 7 | A Critical Study of Teaching and Learning With Knowledge Resources in Higher Education | Dr. Sanjay Kulkarni | 38 |
| 8 | Implementation of Mahatma Gandhi Tantamukt Village Campaign | Dr. Suresh Shahapure | 41 |
| 9 | Impact of Social Media on Politics | Saurabh Kolhe | 45 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 10 | विपश्यना: तन और मन को स्वस्थ बनाने की प्राचीन भारतीय साधना पद्धति की प्रासंगिकता | प्रा.शांताराम वळवी | 48 |
| 11 | बोल री कठपुतली' में नारी के विविध रूप | अनिता शेजोळे, डॉ. शिवाजी सांगोळे | 54 |
| | **मराठी विभाग** | | |
| 12 | संत तुकाराम आणि कृषि : एक अनुबंध | डॉ.सुनिल निगडे, कल्पना घुगे | 59 |
| 13 | वि. का. राजवाडे यांचा समीक्षा विचार | अस्मिता कुंभार | 63 |
| 14 | वाडगीण : आदिवासींच्या जीवघेण्या संघर्षाची कहाणी | डॉ.सुलतान पवार | 68 |
| 15 | जुगाड : अस्तित्व संघर्षाची अनवट कहाणी | डॉ. सागर पाटील | 75 |
| 16 | आधुनिक तंत्रज्ञान व मराठी भाषा | डॉ.हरेश शेळके | 80 |
| 17 | मराठी नियतकालिकाची स्वरूप आणि संकल्पना | डॉ. शरद दुधाट | 88 |
| 18 | तरसोद गावाचा ऐतिहासिक अभ्यास | डॉ. दिपक किनगे | 94 |
| 19 | मराठी माध्यमांच्या शाळांसमोरील आव्हाने | डॉ. राजेश्वर दुडूकनाळे | 98 |
| 20 | विद्यार्थ्यांच्या शब्दसंग्रह वाढवण्यासाठी शिक्षणात व्हॉट्सअॅपचा प्रभावि वापर | श्री खंडू मोरे | 105 |
| 21 | अध्यापनासाठीच्या संगणक प्रशिक्षण उपक्रमाच्या परीणामकारकतेच अभ्यास | डॉ.स्वाती चव्हाण | 112 |
| 22 | बॅंकेतर वित्तीय संस्थांची भारतीय अर्थव्यवस्थेतील भूमिका | डॉ. मेघा पाटोळे | 115 |
| 23 | पारंपारिक शेती व कृषी तंत्रज्ञान | डॉ. बी एम सोनवणे, संदिप अहिरे | 121 |
| 24 | गोटलां संग्रहांतलें अस्तुरेचें चित्रण | प्रा. दिपा रायकर | 126 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.* ***- Chief & Executive Editor***



Scanned with OKEN Scanner

# तरसोद गावाचा ऐतिहासिक अभ्यास

**डॉ. दिपक दिनकर किनगे**
डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव

**सारांश:**

तरसोद गावाचे वस्तीस्थान, ऐतिहासिक पार्श्वभूमी, सामाजिक स्थिती, आर्थिक परिस्थिती, शिवकालीन श्री गणपतीचे मंदिर, गावाचा शैक्षणिक विकास आणि गावातील ग्रामपंचायत याविषयी अभ्यास करणे हा सदर संशोधनाचा प्रमुख उद्देश आहे. प्रामुख्याने स्थानिक इतिहास लेखनाच्या दृष्टीकोनातून तरसोद गावाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. प्रमुख उद्देशांना अनुसरून सर्व घटकांचे सविस्तर वर्णन शोधनिबंधात करण्यात आलेले आहे.

**पारिभाषिक शब्द:-** स्थानिक इतिहासलेखन, पुरातन, शिवकाळ, पेशवेकाळ, वस्तीस्थान, चतु:सीमा, पंचक्रोशीतील गावे, लोकसंख्या, नदी, नाले, विहिरी, पायविहीर, बारव, गढी, वाडे, घरे, प्रवेशद्वार, मंदिर, ग्रामपंचायत इत्यादी.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये

१. तरसोद गावातील सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

२. तरसोद गावातील आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

३. तरसोद गावातील श्री क्षेत्र गणपती मंदिर संस्थानाचे धार्मिक महत्व अभ्यासणे.

तरसोद गावाचा समावेश मध्ययुगीन खानदेशातील नशिराबाद या महत्वाच्या आणि मोठ्या परगण्यात होता. तरसोद येथे शिवकालीन पुरातन श्री गणेश मंदिर आहे. पेशवेकाळात श्री गणेश हे महत्वपूर्ण दैवत मानले गेले, तेव्हा तरसोद येथील श्री क्षेत्र गणपती मंदिर संस्थानाला महत्व प्राप्त झाले होते.

प्रस्तुत शोधनिबंधात तरसोद गावाचे भौगोलिक स्थान, सामाजिक, आर्थिक, धार्मिक परिस्थिती आणि स्थानिक इतिहास लेखनाचे विविध घटक यांचा विशेषत्वाने अभ्यास करण्यात आला आहे. मध्ययुगीन काळापासून समृद्ध ऐतिहासिक वारसा लाभला असल्याने तरसोद गावाविषयी संशोधन करणे आवश्यक वाटते.

## १. गावाचे वसतिस्थान :

तरसोद (२०°५५' उ. ७५°३०' पू.) हे जळगाव जिल्ह्यातील जुने गाव आहे.[१] जळगाव जिल्ह्याच्या ठिकाणापासून तरसोद गावाचे अंतर सुमारे ०८ किलोमीटर आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ०६ वर तरसोद फाटा आहे. तिथून ०३ किलोमीटरच्या अंतरावर आतमध्ये तरसोद हे गाव वसलेले आहे. तरसोद गावाचे क्षेत्रफळ सुमारे ८३९.६१ हेक्टर्स इतके आहे. २०११ च्या जनगणनेनुसार तरसोद गावात सुमारे ५५९ घरे आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार तरसोद गावाची एकूण लोकसंख्या २,३३३ आहे त्यापैकी पुरुषांची लोकसंख्या १,२४८ आहे तर महिलांची लोकसंख्या ही १,०८५ इतकी आहे. तरसोद गावाचा साक्षरता दर ७१.५८% असून त्यापैकी ७७.७२% पुरुष आणि ६४.५२% महिला साक्षर आहेत.[२]

## २. गावातील नदी, विहिरी आणि बारव :

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेल्या ३ पायविहीरी (बारव) तरसोद गावात आहे. त्यातील एक पायविहीर शिवकालीन श्री गणपतीचे मंदिराच्या परिसरात आजही अस्तित्वात आहे.



Scanned with OKEN Scanner

त्याचबरोबर पूर्वीच्या काळात गावात वस्तीनिहाय आणि समाजनिहाय पिण्याच्या पाण्याच्या विहिरी होत्या;[३] अशी माहिती माजी पोलीस पाटील श्री. अरुण पाटील यांनी दिली आहे.

तरसोद गावात एक नदीवाजा नाला आहे. त्याचे नाव 'हातेड' नाला असे आहे. या नाल्याला अनेकदा प्रचंड पूर येत असतात. एकदा या पुरामध्ये पेशव्यांच्या सरदाराच्या सैन्यातला एक हत्ती देखील वाहून होता. त्या घटनेवरून या नाल्याला 'हातेड' हे नाव मिळाले आहे,[४] अशी माहिती श्री. शरद काळे यांनी दिली.

### ३. गावाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

मराठ्यांच्या फौजा जेव्हा उत्तरेस मुलूखगिरी करण्यासाठी जात असत. तेव्हा मुरारखेडा, तरसोद या परिसरात थांबत असत. मुलूखगिरीची कामगिरी निर्विघ्नपणे पार पाडवी या ईच्छेने आपल्या फौजांबरोबर आलेले मराठे सरदार व स्वतः पेशवेसुद्धा येथील श्री गणपती मंदिरात दर्शनासाठी येत असत.[५] स्वतः पेशवे म्हणजे तत्कालीन राज्यकर्ते या मंदिरात दर्शनासाठी येत असल्याने पेशवेकाळात देवस्थानाचे महत्व वाढीस लागल्याचे स्पष्ट होते. आणी त्यामुळेच श्री गणपती संस्थान, तरसोद हे सामान्य जनतेचे आराध्य दैवत बनले असावे.

गावातील लोकांनी स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला होता. अण्णा कुलकर्णी हे गावातील स्वातंत्र्यसैनिक होते. इतरही अनेक स्वातंत्र्यसैनिक होते, पण त्यांची नोंद करण्यात आलेली नाही,[६] ही माहिती श्री. अरुण पाटील यांनी दिली आहे.

### ४. सामाजिक स्थिती:

तरसोद गावात विविध जातीचे लोक राहतात. त्यात मराठा, माळी, लेवापाटील, नाथ, चांभार, कुंभार, महार, तेली, राजपूत, शिंपी, सोनार, ब्राम्हण, कोळी, धनगर, भिल्ल अशा विविध जातींच्या लोकांचा समावेश होतो. तरसोद गावाची मुलकी पाटीलकी मोतीराम पाटील यांच्याकडे घराण्याकडे होती. पाटीलकीच्या वतनी जमिनी त्यांना मिळाल्या होत्या. स्वातंत्र्योत्तर काळात काही घराण्याकडे इनामी जमिनी होत्या. गावकामगारांना ही इनामी जमिनी मिळालेल्या होत्या. अण्णा कुलकर्णी यांच्याकडे घराण्याकडे कुलकर्णी वतन होते. तसेच गावात महार वतनही मिळत होते. तसेच या वतनदार मंडळींना समाजात मनाचे स्थान होते.[७] अशी माहिती श्री. अरुण पाटील यांनी दिली.

### ५. गावाची आर्थिक परिस्थिती :

गावातील लोकांचा शेतीकाम हा प्रमुख व्यवसाय आहे. शेतकरी लोक शेतीतून गहू, हरभरा, दादर, कापूस, सोयाबीन, उडीद, मूग, तुर इत्यादी पीके घेतात. पूर्वी लेवा पाटील समाजातील शेतकरी लोक धने, जिरे, ओवा या मसाल्याच्या पदार्थांची लागवड करायचे आणि चांगले उत्पादन घेत असत. पण कालांतराने हे उत्पादन कमी झाल्याने या पिकांची लागवड करणे बंद होत गेले.[८]

ज्या लोकांकडे शेती नाही, असे लोक शेतमजुरी करून आपली उपजीविका करतात. त्याच बरोबर गावापासून जवळच जळगाव शहरामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत अनेक कारखाने व उद्याग-धंडदे चालविले जातात. त्या कारखाने व उद्याग-धंद्यांमध्ये गावातील लोक कामगार म्हणून कामाला जातात. तरसोद गावातील महिला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील चटई कारखान्यात कामाला जात्तात. आणि आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावतात. तसेच काही महिलांनी गावात बचत गटही सुरु केलेले आहेत.[९] अशी माहिती गावातील तलाठी सौ. सारिका दुर्गुडे यांनी दिली आहे.



Scanned with OKEN Scanner

**६. गावातील घरे-वाडे:**

गावात पूर्वीच्या काळात ०८ ते १० फुट उंच ओट्याची मराठा समाजातील बाविस्कर घराण्यातील लोकांची घरे प्रसिद्ध होती. आजरोजी गावातील बहुतांशी घरे पक्क्या स्वरुपाची आहेत. गतकाळात या गावात माती व विटांपासून घरे बनविण्यात येत असत. अशी काही घरे आजही पडक्या अवस्थेत गावात बघायला मिळतात. तर काही लोकांची घरे आजही मातीची, तर काही पक्क्या घरांवर टीन-पत्रे टाकलेली दिसतात. वर्तमान परिस्थितीत गावात कुंभार वाडा, माळी वाडा, पाटील वाडा, बऱ्हाटे वाडा, अल्करी वाडा (राजपूत) अशी विविध जातीनिहाय वाडे आढळतात. पुरातन काळापासून ही वाड्यांची रचना अस्तित्वात आहे. आज रोजी गावातील विविध वाड्यांमध्ये विविध जाती-समाजाचे लोक राहतात.[१०]

**७. शिवकालीन श्री गणपतीचे मंदिर :**

तरसोद येथे शिवकालीन प्रसिद्ध गणपती मंदिर आहे. इ. स. १६६२ मध्ये हे मंदिर मुरारखेड्याच्या देशमुखांनी बांधले.[११] गणपती मंदिर विश्वस्ताकडून मिळालेल्या माहितीनुसार मराठ्यांची फौज उतरेकडे निघाली असता तरसोदजवळील मुरारखेडे (आता ओसाड) येथे मुक्कामी होती. त्यातील एक भक्त मोरेश्वर हणमंत देशपांडे याने मंदिर बांधले. या मंदिराचा जीर्णोध्दार इ. स. १९९३-९४ साली करण्यात आला, अशी माहिती जळगाव जिल्हा गाझेटीअरमध्ये प्राप्त होते.[१२] श्री गजाननाचे मंदिर नशिराबाद, मुरारखेडे, दिगर व तरसोद या तिन्ही गावच्या सीमा ज्या ठिकाणी मिळतात तेथे आहे. त्यामुळे या तिनही गावांचे तसेच तरसोद पंचक्रोशीतील लोक श्री गणपतीच्या दर्शनासाठी येतात.

श्री क्षेत्र पद्मालयचे सत्पुरुष श्री गोविंद महाराज, शेगावचे संत गजानन महाराज, आळंदी येथील सिध्द पुरुष श्री. नरसिंह सरस्वती स्वामी महाराज, नशिराबाद येथील झिपरू अण्णा महाराज इत्यादी संत मंडळी तरसोदच्या श्री गणपती मंदिरात दर्शनासाठी येत असत. अशा रीतीने संत महात्मे, स्वामी आणि सिध्दपुरुषाच्या पादस्पर्शाने पुनीत झालेल्या तरसोद गावास तीर्थक्षेत्राचे स्वरुप प्राप्त झाले आहे.[१३] अशी माहिती मंदिराचे पुजारी श्री. गजानन कुलकर्णी यांच्याकडून प्राप्त झाली.

तसेच तरसोद गावात जुने व प्रसिद्ध भवानी मंदिर आणि विठ्ठल मंदिरही आहे. याशिवाय खंडेराव देवस्थान व मरीआई मंदीर ही पुरातन काळातील मंदीरे आहेत. ती ग्रामदैवते म्हणून ओळखली जातात, अशी माहिती गावातील लोकांनी दिली आहे.

**८. संशोधनाच्या गृहीतकांची सिद्धता-**

तरसोद गावाचा अभ्यासांती गावाला ऐतिहासिक वारसा आहे आणि तरसोद गावातील श्री क्षेत्र गणपती मंदिर संस्थानाला धार्मिक महत्व आहे, असे स्पष्ट होते. तसेच तरसोद गावातील लोकांचे उपजीविकेच्या साधनांचा अभ्यास केल्यावर गावाची आर्थिक स्थिती साधारण आहे, असे निदर्शनास आले.

**९. संशोधनाचे निष्कर्ष-**

१. तरसोद गावाला शिवकाळापासून ऐतिहासिक वारसा असल्याचे स्पष्ट होते.
२. गावात विविध जाती-जमातीचे लोक राहतात.
३. तरसोद गावाची अर्थव्यवस्था प्रारंभी केवळ कृषी आधारित होती, मात्र वर्तमान काळात विविध दुकाने, जळगाव एमआयडीसीतील कारखाने, उद्योग-धंद्यांवर आधारित आहे.



Scanned with OKEN Scanner

४. गावातील पुरुषांप्रमाणे महिला सुद्धा आपल्या कुटुंबाच्या आर्थिक भरभराटीसाठी हातभार लावत असल्याचे स्पष्ट होते.

५. तरसोदसारख्या लहान खेडेगावातील शिवकालीन (इ. स. १६६२) श्री गणपती मंदिराचे जागृत देवस्थान महत्त्वाचे स्थान साडेतीनशे वर्षे झाले कायम आहे.

६. पुण्याचे पेशवे उत्तरेकडे लष्करीमोहिमेवर जात असतांना श्री गणपतीचे दर्शन घेत असत. त्यावरुन पेशवेकाळात या मंदिरास महत्वपुर्ण स्थान असल्याचे स्पष्ट होते.

७. यात्रेच्या आयोजनामुळे गावाच्या परिसरातील लोकांना अल्पकालीन रोजगार प्राप्त होत होता आणि आजही प्राप्त होतो.

**१०. संदर्भ :**

१. कि. का. चौधरी (१९९४): जळगाव जिल्हा गाझेटीअर, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. ७६८
२. http://villageinfo.in/maharashtra/jalgaon/jalgaon/tarsod.html
३. श्री. अरुण कौतिकराव पाटील, वय-७६, माजी पोलीस पाटील, तरसोद यांची मुलाखत
४. श्री. शरद काळे, वय-५७, जळगाव यांची मुलाखत
५. मंदिरावरील फलक यावरून घेतलेली माहिती
६. श्री. अरुण कौतिकराव पाटील, वय-७६, माजी पोलीस पाटील, तरसोद यांची मुलाखत
७. श्री. अरुण कौतिकराव पाटील, वय-७६, माजी पोलीस पाटील, तरसोद यांची मुलाखत
८. श्री. ज्ञानेश्वर कोळी, कोतवाल तलाठी कार्यालय, तरसोद यांची मुलाखत
९. सौ. सारिका दुर्गुडे, तलाठी, तरसोद यांची मुलाखत
१०. प्रत्यक्ष गाव भेट दिनांक- १२/१०/२०२२
११. मंदिरावरील फलक यावरून घेतलेली माहिती
१२. कि. का. चौधरी (१९९४): जळगाव जिल्हा गाझेटीअर, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. ७६८
१३. श्री. गजानन कुलकर्णी, पुजारी, वय-७० श्री. गणपती मंदिर, तरसोद यांची मुलाखत



Scanned with OKEN Scanner